# जिल्हाधिकारी कार्यालय, (पुनर्वसन शाखा) पुणे
## नविन जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, तळमजला, ए विंग ,
## पुणे ४११००१
## ( विधी अधिकारी - कंत्राटी भरती )

***************************************************************************

क्रं. जिपुअ/आस्था/कावि/२३६/२०२५ पुणे दि.१५.०७.२०२५

जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथील पुनर्वसन शाखा, पुणे येथे विधी अधिकारी या पदाची कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याच्या कालावधी साठी नियुक्ती करावयाची आहे. त्या करिता पात्र उमेदवारांकडून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून विहित नमुन्यांत दिनांक :-२३.०५.२०२५ पासुन दिनांक ३०.०६.२०२५ सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत अर्ज मागविणेत आले होते. तथापी आवश्यक तेवढा प्रतिसाद न मिळाल्याने सदर जाहिरातीस प्रसिध्दी दिनांक १५.०७.२०२५ ते दिनांक २२.०७.२०२५ रोजी सायंकाळी ६.१५ वाजे पर्यंत.

---

| | | |
|---|---|---|
| पदाचे नांव | :- | विधी अधिकारी (कंत्राटी) |
| पदसंख्या | :- | ०१ |
| मासिक मानधन | :- | एकत्रित मानधन रुपये ८०,०००/- + ५,०००/- दुरध्वनी व प्रवास खर्च रुपये /- असे एकत्रित मानधन रुपये ८५,०००/- प्रतिमाह या व्यतिरिक्त कोणतेही भत्ते देय होणार नाही. |

### शैक्षणिक अर्हता व अनुभव :-

(1) कायदयाची एल एल बी किंवा एल एल एम पदवी असणे आवश्यक आहे

(2) उमेदवार हा जिल्हा न्यायाधिश अथवा समकक्ष पदाचा असावा.

(3) उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

(4) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कायद्याचा पदवीधर तसेच सनदधारक असणे आवश्यक आहे.

(5) विधी अधिकारी या पदासाठी वकील व्यवसायाचा किमान १० वर्षाचा अनुभव आवश्यक.

(6) उमेदवार महसूल तसेच पुनर्वसन अधिनियमांचे विषयाचे सखोल ज्ञान असावे , सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय

चौकशी इ.बाबत ज्ञानसंपन्न असणे आवश्यक, ज्यामुळे कायद्येविषयक कार्यवाही कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.

(७) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.

--: मुदतवाढीचा तपशिल खालील प्रमाणे :--

**वेळापत्रक**

| अ.क्र | तपशिल | कार्यवाही दिनांक |
|---|---|---|
| १ | जाहिरात मुदतवाढ प्रसिध्दी | दि. १५.०७.२०२५ |
| २ | अर्ज मागविणेचा कालावधी | दि. १५.०७.२०२५ ते दि. २२.०७.२०२५ (८ दिवस) |
| ३ | अर्ज छाननी | दि. २३.०७.२०२५ ते दि. २५.०७.२०२५ (३ दिवस) |
| ४ | मुलाखतील पात्र उमेदवार प्रसिध्दी | दि. २८.०७.२०२५ |
| ५ | उमेदवारांची मुलाखत | दि. ३१.०७.२०२५ |
| ६ | उमेदवार नियुक्त आदेश | दि. ०१.०८.२०२५ |

(सुहास मापारी)
अपर जिल्हाधिकारी पुणे

## --: नेमणुकीचे स्वरुप :--

विधी अधिकारी हे पद नियमित स्वरुपात नसून 11 **महिन्याकरिता पुर्णतः कंत्राटी पध्दतीने भरण्यात येईल. विधी अधिकारी हे पद शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.**

## --: विधी अधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :--

(1) कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व कायदेविषयक बाबींबाबत / न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे तसेच सुनावणी साठी मा. उच्च न्यायालय, मुंबई व मा. सर्वोच्च न्यायालय येथे सुनावणी तारखेस उपस्थित रहाणे.

(2) महसूल विषयक परिच्छेदनिहाय अभिप्राय (Parawise Comments) तयार करणे / सेवाविषयक / प्रशासकीस बाबी / विभागीय चौकशी इ. तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

(3) प्रलंबित न्यायालयीन प्रकरण तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासनाचा प्रतिवादी आहे. अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्र संबंधित अधिकाऱ्याच्या मदतीने तयार करणे,

(4) शपथपत्राचा मसूदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवून न्यायालयात विहित मुदतीत सादर होईल, याची दक्षता घेणे.

(५) जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे, अशा प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तदअनुषंगाने अपिल दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

(६) अपिल करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपिलाचा मसूदा तयार करुन तो संबंधित सरकारी वकीलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

(७) सर्व न्यायालयीन प्रकरणांसाठी विभागीय स्तरावर नोडल ऑफिसर म्हणून काम पहाणे.

(८) विधि विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमुन दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.

स्थळ :- पुणे
दिनांक :- ११.०७.२०२५

(सुहास मापारी)
अपर जिल्हाधिकारी पुणे

## --: उमेदवारांना आवश्यक सूचना :--

(1) शैक्षणिक अर्हता व अनुभवामधील सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा अर्ज अपात्र ठरतील.

(2) अनुभवातील मराठी व इंग्रजी भाषेच्या ज्ञानाची पडताळणी करण्यासाठी तोंडी मुलाखती घेण्यात येतील.

(3) महसूल विषयक, सेवाविषयक, प्रशासनीक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ. बाबत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायद्येविषयक कार्यवाही याबाबतचे उमेदवाराचे विशेष प्राविण्य पडताळणीसाठी आवश्यकता वाटल्यास लेखी चाचणी (पुनवर्सन प्रकरणी प्रतिज्ञापत्र दाखल करणेबाबत) घेण्यात येईल.

(4) सदर जाहिरात व त्यासोबत अर्ज व प्रतिज्ञापत्राचा विहीत नमूना या कार्यालयाचे संकेतस्थळ *https://pune.gov.in* येथे प्रसिध्द करण्यात आलेली आहे. उमेदवारांनी त्याच नमून्यात A-4 आकाराच्या कागदावर एका बाजूस टंकलिखीत / मुद्रीत करुन मुदतीत खालील पत्त्यावर दि. २२.०७.२०२५ रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत प्राप्त होतील अशा रितीने **ईमेल/पोस्टाने/कार्यालयात समक्ष पाठवावे**. त्यांनतर प्राप्त होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

| | |
|---|---|
| कार्यालयाचा पत्ता | जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय, ए विंग, तळमजला, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे, पिन कोड नंबर ४११००१ |
| कार्यालयाचा ईमेल आयी | dropune@gmailcom |

(5) विहीत नमुन्यातील अर्ज लखोटयात बंद करुन लखोटयावर कंत्राटी पध्दतीने विधी अधिकारी पदासाठी अर्ज अशा उल्लेखासह सादर करावेत.

अर्ज पाठविण्याचा पत्ता:-
जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय, पुणे ए विंग, तळमजला, नविन जिल्हाधिकारी कार्यालय ईमारत, पुणे १

(6) दि.२२.०७.२०२५ रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून दि. २८.०७.२०२५ रोजी पात्र उमेदवारांच्या अर्जाची यादी *https://pune.gov.in* या संकेतस्थळावर तसेच कार्यालयाचे सुचना फलकावर लावून प्रसिध्द करण्यात येईल.

(7) अंतिम निवड झालेल्या उमेदवाराचे नाव यथावकाश कार्यालयाचे सुचना फलकावर तसेच संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

(8) निवड झालेल्या उमेदवारास शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. ईएसटी-2013/प्र.क्र.173/ई-8, दि.14.11.2013 मध्ये विहीत केलेल्या नमुन्यातील करारनामा करुन देणे बंधनकारक राहिल.

(9) कंत्राटी पध्दतीने विधी अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या उमेदवारास दररोज संपूर्ण कार्यालयीन वेळेत कामकाज करावे लागेल. तसेच नेमनूकीच्या पदाच कर्तव्ये व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील.

(१०) सुनावणी साठी मा. उच्च न्यायालय, मुंबई व मा. सर्वोच्च न्यायालय येथे सुनावणी तारखेस उपस्थित रहाणे बंधनकारक राहिल.

(११) या प्रक्रीयेमध्ये बदल करण्याचा अथवा स्थगिती / रद्द करण्याचा अधिकार मा. अपर जिल्हाधिकारी, पुणे यांना राहिल व त्यांचा निर्णय अंतिम असेल,

(सुहास मापारी)
अपर जिल्हाधिकारी, पुणे